Page No.
Date

नाव :- शेगंटे कविता अकुंश

कॉलजचे नाव :- ॲड. एम. एन देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूरा

विषय :- स्थुल अर्थशास्त्र

वर्ग :- S.Y.B.A

रोल नं :- 467

सेमिस्टर :- IV

Page No.
Date

1 चलनविस्ताराची व्याख्या सांगुन चलन विस्ताराची कारणे व परिणामी सविस्तर स्पष्ट करा.

चलन विस्ताराची व्याख्या :-

1. प्रा. क्राऊथर यांच्या मते :- "पैशांचा मूल्य कमी होऊन किंमत पातळी वाढणे म्हणजे विस्तार होय".

2. प्रा. कोलबर्न यांच्या मते :- "अल्पशा वस्तुच्या अफाट पैशाने केलेला पाठलाग म्हणजे चलनवाढ होय".

3. प्रा. हॉट्रे यांच्या मते :- "पैशांचा अतिरिक्त पुरवठा म्हणजे चलनविस्तार होय".

चलनवाढीची कारणे :-
चलनवाढीची प्रामुख्याने दोन कारणे आहेत.

(अ) मागणी - ताणनिर्मित चलनविस्तार | मागणीत वाढ घडुन आणणारे घटक -
(ब) खर्च - दाबनिर्मित चलनविस्तार | पुरवठ्यात घट घडुन आणणारे घटक.

(अ) मागणीत - ताण निर्मित चलन विस्तार :- "प्रचलित किंमतीला एकुण पुरवठ्यापेक्षा एकुण मागणी वाढली तर किंमती वाढतात, त्याला मागणी ताण निर्मित चलनविस्तार असे म्हणतात."
अर्थात मागणी ताण- निर्मिती चलन विस्तार ही वस्तु व सेवांची मागणी वाढल्याने निर्माण होत असते म्हणुन मागणीत वाढ →

घडून आणणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **मागणीत वाढ घडवून आणणारे घटक :-**

1) पैशाच्या पुरवठ्यात वाढ
2) सार्वजनिक खर्चातील वाढ
3) खाजगी खर्चातील वाढ
4) निर्यातीत वाढ
5) सीमांत उपभोग प्रवृत्तीतील वाढ
6) लोकसंख्येतील वाढ
7) करामधील घट
8) अंतर्गत कर्जाची परतफेड
9) तुटीचा अर्थभरणा
10) स्वस्त पैसा धोरण
11) काळा पैसा इ.

(1) **पैशाच्या पुरवठ्यातील वाढ :-**

अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा प्रमाणापेक्षा जास्त आणि वस्तु कमी अशी स्थिती निर्माण होऊन लोकांच्या क्रयशक्तीत वाढ होऊन वस्तुंच्या किंमती वाढतात आणि भाववाढ घडून येते. आज भारतातील भाववाढीच्या अनेक कारणांपैकी पैशांच्या पुरवठ्यात झालेली वाढ हे एक प्रमुख कारण आहे.

(2) **सार्वजनिक खर्चातील वाढ :-**

कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमुळे सरकारकडून केल्या जाणाऱ्या कार्यात फार मोठी वाढ झाली आहे. तसेच युद्धजन्य काळात आणि आर्थिक नियोजनाच्या काळात सरकार फार मोठा खर्च करीत असते. एकूणच सार्वजनिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने वस्तुंकरीता मागणी वाढ पूर्ण रोजगार पातळीनं

एकुण खर्चात होणाऱ्या वाढीबरोबर उत्पादनात वाढ होत नसल्याने अतिरिक्त मागणीची परिस्थिती निर्माण होते. परिणामी किंमतीत सातत्याने भरमसाठ वाढ होते.

③ **खाजगी खर्चात वाढ :-**
खाजगी उपभोग किंवा गुंतवणुक खर्चातील वाढीमुळे अर्थव्यवस्थेत एकुण मागणी अतिरिक्त होत असते. जेव्हा व्यावसायिक स्थिती चांगली असते तोपर्यंत खाजगी उद्योजक अधिकाधिक गुंतवणुक करतात. त्यामुळे उत्पादन घटकांच्या मागणीत वाढ होते. त्यांच्या किंमती वाढतात उत्पादन घटकांच्या उत्पन्नात आलेल्या वाढीमुळे उपभोग खर्चात वाढ होऊन मागणीत वाढ होते.

④ **निर्यातीत वाढ :-**
वस्तुंची निर्यात केल्यामुळे देशीच बाजारपेठेत वस्तुंची उपलब्धता कमी होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये अंतर्गत वस्तुंची टंचाई निर्माण होते. तसेच निर्यातीमुळे निर्यातदारांची क्रयशक्ती वाढते. परिणामी देशीच बाजारपेठेत वस्तुंच्या किमंतीत वाढ होऊन मागणी प्रेरित चलनवाढ निर्माण होते.

⑤ **सीमांत उपभोगप्रवृत्तीतील वाढ :-**
लोकांची सीमांत उपभोग प्रवृत्ती वाढते तेव्हा वस्तुंच्या मागणीत अतिरिक्त वाढ होते. त्याचा परिणामी वस्तुंची किंमत पातळी वाढल्यात होऊन भाववाढ निर्माण होते.

⑥ **लोकसंख्येतील वाढ :-**
लोकसंख्येत वेगाने वाढ होत असेल तर परिणाम स्वरूप अर्थव्यवस्थेतील

Page No.
Date

वस्तु आणि सेवांची एकुण मागणी वाढते. त्यामुळे त्यांच्या किंमत पातळीतही वाढ घडून येते.

⑦ **करांमधील घट :-**

सरकारने कर आकारणीत कपात केल्यास अथवा कर रद्द केल्यास लोकांकडील खर्च शक्य उत्पन्नात वाढ होऊन त्यांची विविध वस्तु व सेवाकरिता असणारी मागणी वाढते, त्याचा परिणाम किंमत वाढीवर होतो.

⑧ **अंतर्गत कर्जाची ~~बस्ताणी~~ परतफेड :-**

सार्वजनिक कर्ज हे आधुनिक सरकारच्या सार्वजनिक आयव्ययाचे एक मुख्य अंग आहे. तेव्हा सरकार अंतर्गत कर्जाची परतफेड करते. तेव्हा लोकांकडील खर्चयोग्य उत्पन्नात वाढ होऊन त्यांची खरेदी शक्ती वाढते. साहजिकच लोकांची विविध वस्तु आणि सेवांची मागणीत वाढ होऊन त्यांच्या किंमत पातळीत वाढ होते.

⑨ **तुटीचा अर्थभरणा :-**

सरकारच्या अंदाजपत्रकातील खर्च त्याच्या उत्पन्नापेक्षा जास्त असेल तर त्या अंदाजपत्रकाला तुटीचे अंदाजपत्रक असे म्हणतात. अंदाजपत्रकातील ही तुट भरून काढण्यासाठी सरकार करांची आकारणी करते देशातुन किंवा विदेशातुन कर्ज उभारणी करते किंवा नवीन नोटा छापुन चलनात आणते यालाच तुटीचा अर्थभरणा असे म्हणतात.

⑩ **स्वस्त पैसा धोरण :-**

स्वस्त पैसा धोरण किं वा विस्ताराचे धोरण यामुळे पैशांच्या पुरवठ्य

वाढ घडून येते. मुख्यत: हे धोरण देशांच्या मध्यवर्ती बँकेकडून अंगीकारले जाते. तेव्हा देशांतील व्यापारी बँका मोठ्या प्रमाणात पतविस्तार करण्यासाठी लोकांना कर्जपुरवठा करतात. कर्जपुरवठ्यामुळे लोकांना कर्जपुरवठा करतात. कर्जपुरवठ्यामुळे लोकांची खरेदी शक्ती वाढते त्याचा परिणाम मागणी वाढण्यावर होऊन अर्थव्यवस्थेत भाववाढ घडून येते.

(11) काळा पैसा :-

करचुकवेगिरी, काळाबाजार, लाचखोरी, भ्रष्टाचार यामुळे समांतर अर्थव्यवस्था निर्माण होऊन काळा पैसा निर्माण होतो. हा काळा पैसा उधळेपणाने खर्च केला जातो. त्यामुळे समग्र मागणीत वाढ होऊन भाववाढ होते. भारतात एकुण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 18 ते 20% काळा पैसा असल्याने किंमत वाढ वेगाने होते.

पुरवठ्यात घट घडवुन आणणारे घटक :-

मागणीत वाढ होऊन आणणाऱ्या घटकांबरोबरच पुरवठ्यात घट घडून आणणारे घटक चलनवाढ होण्यास कारणीभुत ठरतात. पुरवठ्यात घट घडून आणणारे काही घटक पुढिलप्रमाणे आहेत:-

1) उत्पादन घटकांचा तुटवडा
2) नैसर्गिक संकटे
3) औद्योगिक कलह
4) घटत्या उत्पादन फलाच्या नियमाची कार्यवाही
5) एकांगी उत्पादन
6) साठेबाजी
7) कर
8) आयात किमतीत वाढ
9) आंतरराष्ट्रीय घटक

Page No.
Date

10) युद्धजन्य परिस्थिती. इ.

1) उत्पादन घटकांचा तुटवडा :-

श्रम, भांडवली साधने, भुमी, कच्चामाल यासारख्या उत्पादन घटकांबाबत टंचाई अथवा तुटवडा निर्माण झाल्यास उपभोग्य वस्तुंचे उत्पादन कमी होते. इतर उत्पादन घटक उपलब्ध असुनही आवश्यक अशा एका घटकाचा तुट निर्माण झाल्यास वस्तुचा पुरवठा वाढविता येत नाही. त्यामुळे पुरवठा घटीचा परिणाम वस्तुच्या किंमती वाढण्यावर होतो.

2) नैसर्गिक संकटे :-

पुर, भुकंप, दुष्काळ, अतिवृष्टी, अवर्षण इ. नैसर्गिक आपत्तीमुळे वस्तुंच्या उत्पादन प्रक्रिया खंडित होते. त्यामुळे वस्तुचा पुरवठा कमी होतो. उदा., नैसर्गिक आपत्तीचा क्षेत्रावर विपरीत परिणाम होतो. शेती क्षेत्रामध्ये उत्पादन घट घडु येते याचा परिणाम औद्योगिक क्षेत्रावर होऊन तिथेही उत्पादन घट होऊन एकुण पुरवठा कमी होतो. पुरवठा घट ही किंमत वाढीस चालना देते.

3) औद्योगिक कलह :-

ज्या देशांमध्ये औद्योगिक संघ प्रबळ असतात. त्या देशात कामगार संघटना भाव-वाढीस मदत करीत असतात. कामगार संघटना भाववाढीस मदत आपल्या प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी उदा., वेतनवाढ, बोनस, कामाचे तास इत्यादीसाठी संप, टाळेबंदी यासारखे उपाय योजतात याचा परिणाम उत्पादनावर होऊन उत्पादन घट होते.

4) घटत्या उत्पादन फलाच्या नियमाची कार्यवाही :-

जर देशातील उद्योगांमध्ये जुनी आणी कालबाह्य यंत्रे आणी उत्पादन पद्धती यांचा वापर केला जात असेल त

तेथे घटत्या उत्पादन कलाच्या नियमाची कार्यवाही होते. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण कमी राहुन उत्पादनाच्या प्रतिनग खर्चात वाढ होते. साहजिकच यामुळे वस्तुंच्या किंमतवाढीला चालना मिळते.

(5) **एकांगी उत्पादन :-**

जेव्हा अर्थव्यवस्थेत चैनीच्या वस्तु व आरामदायी वस्तुंच्या उत्पादनावर भर दिला जातो. व उपभोग्य वस्तुंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष केले जाते. तेव्हा उपभोग्य वस्तुची टंचाई निर्माण होऊन अशा वस्तुंच्या किमत प्रातहीत वाढ घडुन येते.

(6) **साठेबाजी :-**

अर्थव्यवस्थेत वस्तुंच्या किंमती वाढण्याची शक्यता दिसु लागताच व्यापारी वाढीव किंमतीचा फायदा मिळविण्यासाठी वस्तुंची साठेबाजी सुरु करतात. त्यामुळे बाजारातील आवश्यक वस्तु गायब करतात. या दोषांच्या परिणाम बाजारातील एकुण पुरवठा कृत्रिमरित्या मर्यादित ठेवला जाऊन भाववाढीतिरेकी परिस्थिती अधिक बिकट होते.

(7) **कर :-**

निरनिराळ्या वस्तुंवर राज्य व केंद्र सरकार उत्पादन कर, विक्री कर यासारखे अप्रत्यक्ष कर आकारते. या करांमुळे उत्पादन खर्च वाढतो व करांचे ओझे वस्तुंच्या किंमती वाढवुन ग्राहकांवर लादते. त्यामुळेही भाववाढीस प्रेरणा मिळते.

(8) **आयात किमतीत वाढ :-**

आयात वस्तुवर नकातीसारखे कर बसविले जातात कच्च्या माल व इतर उत्पादनांच्या किंमतीत वाढ आल्याने उत्पादन खर्च वाढतो आणी भाववाढ होते.

(9) **आंतरराष्ट्रीय घटक :-**

आधुनिक काळात चलनवाढ ही आंतरराष्ट्रीय घटकांमुळेही निर्माण होते. जेव्हा विकसीत

Page No.
Date

देशांमध्ये दिसुन येतो. आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोलसारख्या कच्च्या मालांच्या किंमतीत वाढ झाल्यास त्यांच्याशी संबंधित देशांतसुध्दा किंमत वाढ घडुन येते.

(10) **युध्दजन्य स्थिती :-**

युद्धजन्य काळात उत्पादनाची साधनसामग्री उपयोग्य वस्तुकडुन कडुन युध्द साहित्याच्या निर्मितीसाठी वळविली जाते. त्यामुळे उपयोग्य वस्तुकडुन युध्द वस्तुंची टंचाई निर्माण होते. तसेच युध्दकाळात आयातही कमी होते. एकुणच उपभोग्य वस्तुचा पुरवठा कमी होऊन किंमतवाढीस चालना मिळते.

**मागणीत ताण - निर्मितचलनविस्तार व खर्च वाढ निर्मिती चलनविस्तार संकल्पना :-**

चलन विस्तार कोणत्या कारणामुळे निर्माण होतो याविषयी अर्थशास्त्रात दोन मतप्रवाह आढळतात. एक विचार प्रवाह असे म्हणतो की वस्तु व सेवांच्या मागणीतील वाढीमुळे चलनवाढ निर्माण होते. अर्थव्यवस्थेत सरकार किंवा खाजगी व्यक्ती व संस्था यांच्याकडुन येणाऱ्या एकुण मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ आल्याने वस्तुच्या किमतीत वाढ होऊन चलनवाढ घडुन येते यालाच मागणी ताणनिर्मित चलनवाढ असे म्हणतात.

तर दुसरा विचार प्रवाह असे म्हणतो की उत्पादन खर्चात वाढ झाल्याने अथवा वस्तु उत्पादनाच्या पुरवठयात घट झाल्याने वस्तुच्या किमतीत वाढतात. व त्यातुन चलनवाढ होते. त्यालाच खर्च दाबनिर्मित चलन विस्तार असे म्हणतात. अर्थात या दोन्हीही संकल्पना स्वतंत्रपणे पुढिलप्रमाणे :-

Page No.
Date

(अ) **मागणी ताण निर्मित चलनविस्तार :-**

**व्याख्या :-**


प्रचलित किंमतीला एकुण पुरवठ्यापेक्षा एकुन मागणी वाढली तर किमती वाढतात. त्याला मागणी ताणनिर्मिती चलनविस्तार असे म्हणतात. याचाच अर्थ मागणीत वाढ झाल्याने चलनविस्तार होतो हा दृष्टीकोन चलन संख्यामान दृष्टीकोनाशी मिळतात जुळता आहे. म्हणजेच पैशांचा पुरवठा वाढला की वस्तूच्या किंमती अर्थात मागणीत वाढ घडुन आणणारे घटक पुढिलप्रमाणे :-

**मागणीत वाढ घडुन आणणारे घटक :-**

1) पैशांच्या पुरवठ्यात वाढ
2) सार्वजनिक खर्चातील वाढ
3) खाजगी खर्चातील वाढ
4) निर्यातील वाढ
5) सीमांत उपभोग प्रवृत्तीतील वाढ
6) लोकसंख्येतील वाढ
7) करामधील घट
8) अंतर्गत कर्जाची परतफेड
9) तुटीचा अर्थभरणा
10) स्वस्त पैसा धोरण
11) काळा पैसा . इ.

यासारख्या घटकांमुळे मागणी वाढत जाते म्हणजेच मागणी - ताण निर्मित चलन विस्तार होतो हा चलविस्तार पुढिल आकृतीने दाखवला येतो.

→




## मागणी-ताण निर्मित चलन विस्तार आकृतीचे स्पष्टीकरण :-

वरिल आकृतीत आडव्या 'अक्ष' अक्षावर उत्पादन तर उभ्या 'अय' अक्षावर किंमत पा[तळी] मोजली आहे. पुरवठा वक्र 'व' हा स्थिर असताना मागणीत सातत्याने होणाऱ्या वाढीमुळे जो परिणाम किंमतीवर होतो. तो मागणी ताणनिर्मिती चलन विस्तार म्हणुन ओळखला आहे. आकृतीत मागणी वक्र 'म' हा 'प' पुरवठा वक्राला छेदतो तेव्हा 'अ-ख' एवढे, उत्पादन मिळते तर किंमत पातळी मिळते पुढे मागणी वक्र 'म1' हा पुरवठा वक्र छेदतो तेव्हा 'अ-ख' एवढे उत्पादन मिळते तर 'अ-क' एवढी किंमत पातळी मिळते पुढे मागणी वक्र 'म1' हा पुरवठा वक्र छेदतो तेव्हा 'अ-ख... एवढी उत्पादन वाढ होते तर 'अ-क1' एवढी किंमत पातळी ठरते. त्याचप्रमाणे स्थलांतरित माग...

Page No.
Date

वक्र 'म₂' हा पुरवठा वक्राला 'न' बिंदुत छेदतो तेव्हा 'अख्य₂' एवढेच उत्पादन मिळते तर 'अक₂' एवढी किंमत पातळी मिळते. मात्र 'न' बिंदुच्या पुढे पुरवठा वक्र स्थिर असल्याने उत्पादन पुर्वी इतकेच राहते. (अख्य₂) मात्र मागणी सतत वाढती राहिल्याने केवळ किंमती वाढताना दिसतात 'न' बिंदुच्या पुढे पुर्ण रोजगार असल्याने पुरवठा वक्र ताठर राहतो. त्यामुळे 'न' बिंदुच्या पुढे दिसणारी 'न' बिंदुच्या पुढे पुर्ण रोजगार असल्याने पुरवठा वक्र ताठर राहतो. त्यामुळे 'न' बिंदुच्या पुढे दिसणारी चलनवाढ म्हणजेच मागणी ताण- निर्मित चलनवाढ होय.

खर्च - दाबनिर्मित चलन विस्तार :-

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व नंतर चलनविस्ताराचा खर्च दाब सिद्धांत आर्थिक प्रसिद्ध झाला आहे. अर्थ शास्त्रज्ञांच्या एका गटाच्या मते चलनवाढ अतिरिक्त मागणीमुळेच निर्माण होत नाही तर खर्चातील वाढीमुळे म्हणजेच उत्पादनात घट झाल्यामुळे निर्माण होते अशी चलनवाढ म्हणजे खर्च दाबनिर्मित चलनवाढ होय उत्पादक घटकांच्या किमतीत वाढ झाल्यामुळे उत्पादन खर्च वाढतो व त्यामुळे वस्तुंच्या किंमतीत वाढ होऊन खर्च दाब निर्मित चलनविस्तार होत असतो. असे या अर्थशास्त्रज्ञांचे मत होते. अर्थात खर्च दाब- निर्मित चलन विस्तार ही संकल्पना संकल्पना पुढिलप्रमाणे पाहु.

व्याख्या :-


" जेव्हा प्रचलित किमंतीला मागणी स्थिर असताना पुरवठ्यात घट अथवा उत्पादन खर्चात वाढ झाल्याने जी भाववाढ निर्माण होते तिला खर्च दाबनिर्मित चलनविस्ताराची आहे. म्हणतात"

याप्रकारे खर्च वाढनिर्मित चलन विस्ताराची व्याख्या केली जाते. अर्थात अर्थ वाढनिर्मित चलन विस्तार हा उत्पादनाच्या पुरवठ्यात घट झाल्याने होतो. म्हणुन पुरवठ्यात घट घडून आणणारे घटक पुढिलप्रमाणे आहे.

**पुरवठ्यात घट घडून आणणारे घटक :-**

1. उत्पादन घटकांचा तुटवडा
2. नैसर्गिक संकटे
3. औद्योगिक कलह
4. घटत्या उत्पादन कलाच्या नियमाची कार्यवाही
5. एकांगी उत्पादन
6. सट्टेबाजी
7. कर
8. आयात किमतीत वाढ
9. आंतरराष्ट्रीय घटक
10. युद्धजन्य परिस्थिती. इ.

वरिल प्रकारच्या घटकांमुळे पुरवठ्यात घट घडून येत असते व त्यातुन उत्पादन खर्च वाढतो. खर्च वाढनिर्मिती चलन विस्ताराचे अधिक स्पष्टीकरण पुढिल आकृतीवरून आपणास स्प करता येते.




खर्च वाढ निर्मित चलन विस्तार

## आकृतीचे स्पष्टीकरण :-

वरील आकृतीत अशा 'अक्ष' अक्षावर उत्पादन तर 'अय' अक्षावर किंमत पातळी मोजली आहे. आकृतीमध्ये मागणी वक्र 'म' हा स्थिर असुन पुरवठा वक्र घरताना दिसतो. पुरवठा वक्रास घट झाल्याने वस्तुच्या उत्पादनात घट होते. त्याचा परिणाम किमती वाढताना दिसतात. जसे की 'प' 'प₁' 'प₂' या पुरवठा वक्राला अनुक्रमे 'कु', 'कु₂' या वाढत्या किमती दिसतात. आणी यालाच खर्च- दाबनिर्मित चलनविस्तार असे म्हणतात.

## चलनवाढीचे परिणाम :-

अर्थव्यवस्थेत अवास्तव चलनवाढ दीर्घकाळ आणी उग्र स्वरूपाची असेल तर तिचे समाजाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक आणी नैतिक जीवनावर, प्रतिकुल परिणाम होतात. या सर्व परिणांमाचे वर्गीकरण आपणास खालील मुख्य: तीन गटात करता येते.

(अ) **उत्पादनावरिल परिणाम :-**

अर्थव्यवस्थेत जोपर्यंत सौम्य चलनवृध्दी होत असते. अशा वेळी चलनवाढ ही उत्पादन, रोजगार वाढविल्यास सहाय्यकारी ठरते. मात्र अर्थव्यवस्थेत पुर्ण रोजगार पातळीनंतर अथवा फार मोठ्या प्रमाणावर चलनवृध्दी होत असेल तर त्याचे प्रतिकुल परिणाम उत्पादन कार्यावर पुढिलप्रमाणे होताना दिसुन येतात.

(1) **साधनसामग्रीची विभमवाटणी :-**

चलनवाढीमुळे साधन सामग्रीची विषम वाटणी होव्यास प्रोत्साहन मिळते.

ज्या वस्तुंच्या उत्पादनामध्ये अधिक नफ्याची अपेक्षा आहे. अशा चैनीच्या वस्तु उत्पादनामध्ये साधनसामग्री वळविली जाते. त्यामुळे जीवनावश्यक वस्तु उत्पादनांच्या प्रमाणात घट होऊन त्यांचा पुरवठा कमी होतो व किंमत पातळीस चालना मिळते.

(२) **उत्पादन घट :-**
अवास्तव चलनवाढीच्या काळात उत्पादन घटकांच्या किंमतीमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ घडुन येते यामुळे उदयोजक गुंतवणूक वा करण्यास तयार होत नाही. परिणामी उत्पादनात घट होते.

(३) **वस्तुंच्या दर्जात घट :-**
चलनवाढीच्या परिस्थितीत वस्तुंच्या किंमती वाढ असतात. तसेच बाजारात अशा वस्तुंचा तुटवडाही जाणवत असतो. अशा परिस्थितीत उत्पादक अधिक नफा मिळविण्यासाठी कुत्सम दर्जाच्या वस्तुंचे उत्पादन करतात. परिणामी वस्तुंच्या दर्जात घट होते.

(४) **बचतीवर प्रतिकुल परिणाम :-**
अवास्तव चलनवाढी मुळे पैशांच्या मुल्यात घट होते. वस्तुंच्या किंमत पातळीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्यामुळे उपभोक्त्यांच्या खर्चात वाढ होऊन त्यांचे वास्तव उत्पन्न कमी होते त्याचा प्रतिकुल परिणाम त्यांच्या बचतीवर होऊन त्यांची बचत कमी होते. पर्यायाने भांडवलनिर्मिती कमी होते.

(५) **परकीय भांडवलाचे उड्डाण :-**
अति चलनवाढीचा परकीय भांडवलावर प्रतिकुल परिणाम होतो. चलनाचे मुल्य कमी आल्यामुळे परकीय गुंतवणुक कमी लाभदायक ठरते. त्यामुळे =

Page No.
Date

परकीय आंडवल देशात येण्याचे प्रमाण कमी होते. याउलट पुर्वी आलेली परकीय गुंतवणूक देशामधुन काढुन घेतली जाते.

**⑥ साठेबाजी व काळाबाजार :-**

चलनवाढीच्या काळात व्यापार व उपभोक्ते यांच्याकडुन वस्तुंची साठेबाजी केली जाते. व्यापारी नफा मिळवण्याच्या हेतुने वस्तुंची साठेबाजी करुन कृत्रिम टंचाई निर्माण करतात. तर उपभोक्ते भविष्यात जास्त किंमत देऊ नये म्हणुन उपभोग्य वस्तुंची साठेबाजी करतात.

**⑦ अनिश्चिततेचे वातावरण :-**

अतिचलनवृद्धीच्या परिस्थीतीत बाजारामध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे व्यवसायातील जोखीम पत्करायला लोक धजावत नाही. उद्योजकावर याचा प्रतिकुल परिणाम होऊन पर्यायाने उत्पादनावर प्रतिकुल परिणाम होतो.

**⑧ किंमत यंत्रणेच्या कार्यात अडथळा :-**

देशात योग्य प्रकारे उत्पादन होण्यासाठी प्रभावी व कार्यक्षम किंमत यंत्रणा अस्तित्वात असणे गरजेचे असते. चलनवाढीमुळे वस्तुंच्या किंमतीत सतत बदल होत असल्यामुळे किंमत यंत्रणेच्या कार्यात अडथळा निर्माण होतात. परिणामी अर्थव्यवस्थेत सार्वत्रिक संशयाचे वातावरण निर्माण होते.

वरिल प्रकारे चलनवाढीचे एकुणच उत्पादन वाढ, उत्पादनाची रचना यावर प्रतिकुल परिणाम होताना दिसुन येतात.

**ब) विभाजनावरील परिणाम :-**

मवास्तव चलनवाढीच्या →

Page No.
Date

समाजातील उत्पन्न व संपत्तीच्या विभाजना देखील परिणाम होतो. चलनवाढीमुळे सर्वच वस्तूंच्या किंमती सारख्या प्रमाणात वाढत नस त्याने. उत्पन्नाचे पुन: वाटप घडून येते. निरनिराळ्या गटात समाविष्ट होणाऱ्या लोकांच उत्पन्नावर निरनिराळे परिणाम घडून येतात. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरिबांची ग अधिक वाढते. थोडक्यात समाजीकदृष्ट्या अनिष्ट स्वरूपाचे धनको या वर्गाचा तोटा होतो.

(1) धनको आणी ऋणको :-

चलन अनिवृद्धीच्या काळ धनको म्हणजेच कर्ज देणाऱ्या वर्गाचे (सावक नुकसान होते तर ऋणको (कर्ज घेणारे) य फायदा होतो याचे कारण कर्ज घेतले तेव्हा पैशांची खरेदीशक्ती (मुल्य) ही अधिक असते याउलट कर्जाची परतफेड करते वेळी वाढल्या किंमतीमुळे पैशांचे मुल्य घसरलेली असते. त्यामुळे धनको या वर्गाचा तोटा होतो.

(2) मजुरांवरील परिणाम :-

चलनवाढीच्या काळात कामगार, वेतन व पगार मिळविणाऱ्या वर्गाचे नुकसान होते. कारण चलनवाढीमुळे वस्तूंच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढतात व पैशांचे मुल्य घटते त्याचा परिणाम त्यांच्या खर्चात वाढ होण्यात होतो. मात्र उत्पन्न अथवा वेतनवाढ होत नसल्याने त्यांचे नुकसान ह

(3) स्थिर उत्पन्न गट :-

चलनवाढीच्या काळात स्थि उत्पन्न गटाला अधिक नुकसान होते. का त्यांचे उत्पन्न स्थिर असते व किंमती वाढ त्या असतात उदा., निवृत्ती वेतनधारक, खंड, यावर अवलंबुन असलेल्यांना याचा त्रास

4) **गुंतवणूकदार :-**
गुंतवणूक करणारे गुंतवणूकदार दोन प्रकारच्या मालमत्तेत गुंतवणूक करतात. ते म्हणजे-
i) बॉंड, डिबेंचर्स अथवा अन्य निश्चित व्याज मिळणाऱ्या घटकांमध्ये.
ii) **शेअर्स अथवा भागांमध्ये :-**
पहिल्या प्रकारात गुंतवणूक करणाऱ्यांची हानी होते. याचे कारण त्यांचे उत्पन्न स्थीर असते व बाजारात वस्तुंच्या किंमत प्रातळीत वाढ झालेली असते. याउलट दुसऱ्या प्रकारात गुंतवणूक करणाऱ्यांचा फायदा होतो कारण त्यांना मिळणारा लाभांश वाढत जातो. तसेच त्यांच्या वास्तव उत्पन्नातही वाढ होते.

5) **उद्योजक :**
चलनवाढीच्या काळात उद्योजक, व्यापारी व्यावसायिक इत्यादींना मोठ्या प्रमाणात नफा मिळतो. याचे कारण या काळात वस्तुंच्या किंमती वाढतात. त्या प्रमाणात उत्पादन घटकांच्या उदा.., श्रम, कच्चा माल इ. किंमती तुलनेने कमी वाढतात. त्यामुळे या वर्गाच्या नफ्यामध्ये वाढ घडून येते.

6) **शेतकरी :-**
चलनवाढीच्या काळात शेतकरी वर्गाचे उत्पन्न वाढते. याचे मुख्य कारण शेतमालाचा पुरवठा कमी लवचिक असतो. भाव वाढल्यावर लगेच उत्पादन वाढू शकत नाही. दरम्यान किंमती भाराभरी वाढतात. शिवाय भाववाढ होते तेव्हा अन्नधान्याच्या किंमती सर्वात प्रथम वाढतात हा अनुभव आहे. मात्र वाढीव किंमतीचा फायदा हा मोठ्या शेतकऱ्यांनाच

मिळतो. श्रीमंत शेतकऱ्यांजवळ विक्रेय वरदावा कमी असल्यामुळे त्यांना याचा फारसा फायदा होत नाही.

7) **सरकार :-**

अवास्तव चलनवाढीच्या काळात सरकारचा खर्च वाढतो परंतु उत्पन्न फारसे वाढत नाही त्याचप्रमाणे कररूपाने मिळालेल्या पैशाचीही खरेदीशक्ती आर्थिक स्थिती बिघडते त्यातून मार्ग काढण्यासाठी जर सरकारने जास्त कर आकारणी केली तर लोकांच्या मनात सरकारबाबत आस्था राहत नाही.

(क) **इतर परिणाम :-**

चलनवाढीचे उत्पादन आणि विभाजनावर जसे काही परिणाम होतात तसे इतरही काही आर्थिक व आर्थिकेतर परिणाम पुढीलप्रमाणे :-

(1) **व्यवहार शेषातील परिणाम :-**

चलनवाढीमुळे देशातील वस्तुच्या किंमती देशांतील वस्तुंच्या किंमतीच्या तुलनेने जास्त होतात. त्यामुळे आयात जास्त वाढते आणि निर्यात कमी होऊन व्यवहारशेष प्रतिकुल होतो.

(2) **चलनावरिल परिणाम :-**

चलनवाढीने उग्र स्वरूप धारण केले म्हणजेच वस्तु व सेवांच्या किंमती प्रमाणापेक्षा जास्त वाढतात. त्यामुळे लोकांच्या चलनावरिल विश्वास उडतो.

(3) **समाजावरील परिणाम :-**

सामाजिकदृष्ट्या चलन ही त्रासदायक असते. चलनवाढीमुळे श्रीमंत

गरीब यांच्यातील दरी वाढत असते/जाते. जीवनमानाचा खर्च वाढत असल्याने कामगार वेतनाच्या वाढीसाठी संप, टाळेबंदी करतात. याच काळात साठेबाजी, काळाबाजार, सट्टेबाजी, भ्रष्टाचार यात वाढ होते. समाजात असंतोष वाढतो. परिणामतः शासनाच व सरकारवरील विश्वास देखील उडतो.

(४) **राजकीय परिणाम :-**

चलनवाढीमुळे एकूणच समाज जिवन अस्थिर बनते. त्यामुळे सरकारच विरोधी जनमत तयार होतो. विविध राजकीय पक्ष सरकारला विरोध करतात. परिणामी कोळसळण्याची शक्यता सुद्धा निर्माण होते.

Seen

01/03/2024